दै. तरुण भारत 10, ऑक्टो, २०१८

# शासकीय तंत्रनिकेतन-कमला कॉलेज सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शासकीय तंत्रनिकेतन व कमला कॉलेजमध्ये नकताच सामंजस्य करार झाला आहे. या करारांतर्गत जेम्स ॲन्ड ज्वेलरी अभ्यासक्रम कमला कॉलेजमधील बी-होक विभागाच्या मुलींना मोफत शिकवला जाणार आहे. तसेच त्यांना तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दागिने कसे तयार करायचे यासंदर्भात प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे नियमित अभ्यासक्रमाबरोबर कौशल्याभिमुख प्रशिक्षण पूर्ण करता येणार आहे.

शासकीय तंत्रनिकेतनमध्ये धातू प्रबोधिनी अंतर्गत जेम्स ॲन्ड ज्वलरी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम शासकीय असल्याने पूर्णपणे मोफत शिकवला जाणार आहे. त्यामुळे पारंपारिक पद्धतीने दागिने तयार करणाऱ्या कारागिरांनाही तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच कमला कॉलेजमधील बी-होकच्या विद्यार्थीनींना या करारांतर्गत रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. या करारावर कमला कॉलेजचे प्राचार्य जी. बी. पाटील व शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रशांत पट्टलवार यांनी सही केली.

यावेळी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्रा. प्राची खाडे, प्रा. एस. एम. मांडरे आदी उपस्थित होते.